REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ, ' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी रु. ४ (टपाल हंशील माफ) किरकोळ अंकास दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ७ फेब्रुवारी, १९४५ अंक ६

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्
**पेन्टर बेडेकर, ए. जी.,**
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

**दि बँक ऑफ इंडिया लि.**
[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | ३,००,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... ... ... रु. | २,९६,७१,१०० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,४८,३५,५५० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,७४,८५,५५० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.
मुंबईमधील शाखा: बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.
इतर शाखा: अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( माणिक चौक शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर जुनागड, कराची, मद्रास, नागपूर (किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पालनपूर, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, वेरावल, भुज ( कच्छ ).
लंडन एजन्ट्स: वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.
डायरेक्टर्स: सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाईट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.
करंट डिपॉझिट अकाउंट्स:
दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.
बिल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.
एजंट:—एच्. ए. करीमभाई

**दि मागोरा केमिकल कं. लि.,**
पुणें २.
अपेक्षेप्रमाणें ' डिपॉझिटस् ' आल्यामुळें ता. १५-१-४५ पासून आम्हीं डिपॉझिटस् घेण्याचें बंद केलें आहे.
या बाबतींत जनतेनें दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोंत.
पुणें, ता. १५-१-४५. — रा. य. रानडे, मॅनेजिंग एजंटस्.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.**
( शेड्यूल्ड बँक )
हेड ऑफिस : पुणें शहर
विक्रीस काढलेलें नवीन दहा लाखांचें भांडवल सर्व विकलें गेलें आहे.
— भांडवल —

| अधिकृत | विक्रीस काढलेलें व खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. ५०,००,००० | रु. १०,००,००० | रु. ७,५७,३८० |

खेळतें भांडवल रु. १,००,००,००० चे वर
—डायरेक्टर बोर्ड—
श्री. धों. कृ. साठे, चेअरमन
श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.
—शाखा—
डेक्कन जिमखाना, मुंबई, जळगांव, खडकी, गिरगांव (मुंबई), नागपूर
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
सी. व्ही. जोग, मॅनेजर

## विविध माहिती

### पोलिसांसाठी खास आहार

ठाणें येथें पोलिस लाइन्समध्यें एक कँटीन उघडून त्यांत सुमारें ५० अविवाहित पोलीस लोकांस चांगला आहार देण्यांत येतो. त्याचा पोलिसांवर होणारा परिणाम पहाण्यांत येत आहे. आहारांत आवश्यक असलेलीं सर्व द्रव्यें त्यांच्या अन्नांत आहेत, ह्याबद्दल विशेष दक्षता घेण्यांत येते. ह्या प्रयोगाप्रमाणें इतर सरकारी नोकरांसाठीहि व्यवस्था करण्याचा सरकारचा विचार आहे.

### जज्जांचीं नवीं नांवें

बाँबे सिव्हिल कोर्टस ॲक्ट दुरुस्त करून, जज्जांचीं नांवें खालीलप्रमाणें बदलण्यांत येणार आहेत:—

| हल्लींचें नांव | नवें नांव |
|---|---|
| १ सबॉर्डिनेट जज्ज | सिव्हिल जज्ज |
| २ जॉइंट जबॉर्डिनेट जज्ज | जॉइंट सिव्हिल जज्ज |
| ३ फर्स्टक्लास स. जज्ज | सि. जज्ज ( सीनिअर डिव्हि. ) |
| ४ सेकंडक्लास स. जज्ज | सि. जज्ज (ज्युनिअर डिव्हि. ) |

### चीन-अमेरिका रेडिओ फोन

चीन व अमेरिका ह्यांचेमध्यें रेडिओ-टेलिफोनचें दळणवळण लवकरच सुरू होणार आहे.

### असेंब्लीच्या समासदांच्या भत्त्यांत वाढ ?

मध्यवर्ती असेंब्लीच्या सभासदांस हल्लीं रोजचा भत्ता ३० रुपये आहे, तो सध्यांची आर्थिक अडचणींची परिस्थिति लक्षांत घेऊन वाढविण्यांत यावा, असा ठराव असेंब्लींत मांडण्यांत येणार आहे.

### हिंदुस्थानाबद्दल आस्था

हिंदुस्थानांतील दुष्काळ निवारण कार्यासाठीं १९४५-४६ करितां अमेरिकेंतील चर्चेसनीं ५०,००० डॉलर मंजूर केले आहेत.

### मोटवाणे रेडिओ मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

रेडिओ व तत्सम माल तयार करण्यासाठीं वरील कंपनी स्थापन झाली आहे, तिचे सर चुनीलाल बी. मेहता हे अध्यक्ष, श्री. व्ही. जी. मोटवाणे हे उपाध्यक्ष व श्री. एन. जी. मोटवाणे हे मॅ. डायरेक्टर आहेत. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांतील चांगल्या रेडिओंची पेटंटस व लायसेन्स मिळवून नंतर त्यांचें उत्पादन येथें सुरू होईल. त्यासंबंधीं बोलणीं करण्यासाठीं श्री. व्ही. जी. मोटवाणे हे परदेशीं लवकरच जातील.

### कराची येथें ब्रॉडकास्टिंग स्टेशन

युद्धसमाप्तीनंतर लवकरच कराची येथें नभोवाणीचें केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे.

### ग्रामोफोनच्या तबकड्यांच्या नियंत्रित किंमती

हिज मास्टर्स व्हॉइस, कोलंबिया इत्यादींच्या इंग्रजी तबकड्यांची नियंत्रित किंमत १ रु. ८ आणे व देशी भाषांतील तबकड्यांची नियंत्रित किंमत २ रु. आहे. ट्विन, रीगल, रीगल झोन, रेक्स, ओरिअंट, इत्यादींच्या तबकड्यांची नियंत्रित किंमत १ रु. १० आ. आहे. एक इंचाखालील मेन स्प्रिंग ६ रुपयांस मिळाली पाहिजे.

### नवी फिल्म कंपनी

एक कोटि रुपये अधिकृत भांडवलाची व ४० लक्ष रुपये वसूल भांडवलाची एक सिनेमा कंपनी मुंबई येथें नोंदण्यांत आली आहे.

## मुंबई शेअर बाजार

( मेसर्स व्ही. एम. लिमये, आणि कं. पुणें ४ ह्यांजकडून )

| कंपनीचें नांव | मूळ भरलेले रु. | दि. २।२।४५ चे बंद भाव | १९४४ मधील चढउतार | दिलेलें व्याज | व्याज केव्हां मिळतें |
|---|---|---|---|---|---|
| टाटा डिफर्डस् ... | ३० | २१४३-१२-० | २३१५;१९१६ | १२९-८-९ | ऑगस्ट |
| टाटा आर्डिनरी ... | ७५ | ४०५-८-० | ४३५;३६९ | ७३-०-० | ऑगस्ट |
| बॉम्बे डाईंग ... | २५० | १८२०-०-० | २२०१;१६९५ | २५-०-०† | मार्च-सप्टेंबर |
| कोहिनूर ... | १०० | ६१०-०-० | ७६५;५३३ | १२-०-०† | मार्च-सप्टेंबर |
| स्वदेशी ... | १०० | ५४६-०-० | ६५३;४७५ | ३५-०-०‡ | मे |
| नागपूर ... | १०० | ३९७-८-० | ४९८;३६१ | १०-०-०‡ | नोव्हेंबर-एप्रिल |
| फिनले ... | १०० | ३०८-०-० | ३७७;२६५ | २५-०-० | एप्रिल |
| गोकाक ... | १०० | २९७-०-० | ३९४;२८२ | ६-०-०† | ऑक्टोबर-एप्रिल |
| सिंप्लेक्स ... | ५० | २६३-०-० | ३०५;२१८ | ४-०-०† | जानेवारी-जुलै |
| अपोलो ... | २ | ४-१-९ | ५-१०-६;३-६ | ०-३-०‡ | मे |
| इंडि. यु. ऑर्डिनरी ... | १० | १५-५-६ | २१-१४;१३-४-६ | १-४-० | मे |
| ,, डिफर्डस् ... | १ | ३-६-९ | ४-९;२-७ | ०-५-० | मे |
| इंदूर माळवा ... | १०० | ७३६-४-० | १२७०;६३० | १११-०-० | जुलै |
| असो. सीमेंट ... | १०० | २३३-०-० | २५४;२१६ | ७-०-० | जानेवारी |
| बेलापूर शुगर ... | ५० | २२०-०-० | २५९;२१९ | ९-०-० | जानेवारी |
| बॉम्बे बर्मा ... | १२५ | ५४७-८-० | ५७५;३७६ | ७-८-० | डिसेंबर |
| न्यू इंडिया ॲ. ... | १५ | ८१-०-० | ९३-१२;७३ | २-०-० | जुलै |
| शिंदिया स्टीम ... | १५ | ३४-१४-० | ३८;२९-२ | १-४-० | जानेवारी |
| शिवराजपूर ... | १० | ५४-८-० | ८५;४८ | ३-४-० | एप्रिल |
| टाटा केमिकल ... | १० | २०-२-० | ३३;१९ | ... | ... |
| टाटा ऑईल ... | २५ | ६९-८-० | ९०;६८-१२ | ३-०-० | सप्टेंबर |

† संहित व्याज.
‡ अंतिम व्याज.

३½% = ९९ रु. ६ आ. ६ पै चांदी = १२३ रु. ८ आ.
सोनें = ६९ रु. ६ आ. कपास = ४४३ रु. ४ आ.

# अर्थ

## पाचवी मध्यवर्ती अन्नपरिषद्

### धान्याचें उत्पादन आणि पुरवठा

अन्नाचें उत्पादन, पुरवठा व वाटणी ह्यासंबंधांतील प्रश्न हिंदी जनतेस अत्यंत जिव्हाळ्याचे असल्यानें आणि त्यांचे विषयींची परिस्थिति देशाच्या निरनिराळ्या भागांत भिन्नभिन्न असल्या-कारणानें मध्यवर्ती सरकारनें प्रांतिक व संस्थानी सरकारांशीं वेळोवेळ विचारविनिमय करणें, परिस्थितीचा आढावा घेणें व प्रगतीचा कार्यक्रम आखणें स्वाभाविक व आवश्यक झालें आहे. धान्यांच्या पिकांचें क्षेत्र वाढवणें, त्यांच्या उत्पादनांत वाढ घड-वून आणणें, त्यांच्या साठ्याची व वाटणीची व्यवस्था लावणें ह्या बाबींचा सरकारच्या अन्नपुरवठा विषयक कार्यक्रमांत प्रामुख्यानें अंतर्भाव झालेला आहे. गेल्या आठवड्यांत दिल्ली येथें अखिल भारतीय अन्नपरिषद् भरली होती, तीमध्यें झालेल्या चर्चेचा गोष-वारा प्रसिद्ध झाला आहे त्यावरून धान्यांचें उत्पादन आणि वाटणी ह्यांचे बाबतींत काय प्रगति झाली आहे आणि त्यांचे संबंधांत कोणत्या अडचणी व प्रश्न हीं उपस्थित झालीं आहेत ह्याची स्थूलमानानें कल्पना येते. परिषदेचें उद्घाटन करतांना हिंदुस्थान सरकारचे अन्नमंत्री सर ज्वालाप्रसाद श्रीवास्तव ह्यांनीं असें सांगितलें कीं, सामान्य जनतेस पुरेशा व पौष्टिक अन्नाचा पुरवठा करण्याचें ध्येय गाठलें जाईपर्यंत नेटानें प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. हरबरा, डाळी, गोडें तेल इत्यादि खाण्याच्या पदार्थांचा पुरवठा तुटीच्या प्रांतांस करण्याच्या मार्गांत येणाऱ्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता प्रतिपादून सरकारच्या धान्य-खरेदीच्या अग्रहक्काविषयींच्या पद्धतीचाहि त्यांनीं उल्लेख केला. अन्न खात्यांत भावी गरजा आणि पुरवठा ह्यासंबंधांत योजना आखण्यासाठीं एक स्वतंत्र विभाग चालू करण्यांत आला आहे त्याची माहिती सर ज्वालाप्रसाद ह्यांनीं दिली आणि ते धान्याच्या साठ्याच्या व्यवस्थेकडे वळले. लोकांस धान्य मिळतांना तें स्वच्छ व निवडक असणें आवश्यक आहे असें ते म्हणाले. ह्याकरितां अन्न खात्यांत एका डायरेक्ट-राची नेमणूक झाली असून साठ्यांची तपासणी करण्याकरितां अशीच नेमणूक केली जावयाची आहे. ह्या अधिकाऱ्यांचा सल्ला व इतर मदत प्रांतिक सरकारांस मिळण्यासारखी आहे असें त्यांनीं सांगितलें.

खाद्य पदार्थांच्या समाधानकारक वाटणीचे संबंधांतील मुख्य प्रश्नांचा सर ज्वालाप्रसाद ह्यांनीं उल्लेख केला. ते सुटले जाण्याच्या मार्गांतील अडचणी प्रांतिक सरकारांच्या परस्पर सहाय्यानें व मध्यवर्ती सरकारच्या सहकारितेनें सुटले जाण्याची अपेक्षा जनता करीत आहे. ती पुरी होण्यास सरकारनें अधिक नेटानें प्रयत्न करण्याची आवश्यकता स्पष्ट आहे. हिंदुस्थान सरकारच्या कृषि-मंत्र्यांनीं म्हणजे सर जोगेंद्रसिंग ह्यांनीं अन्न-परिषदेंत केलेल्या भाषणावरूनहि ही गोष्ट उघड होत आहे. हिंदी लोकसंख्येपैकीं ३०टक्के लोकांस पुरेसें अन्न खावयास मिळत नाहीं, मग तें अन्नाच्या तुटवड्यामुळें असो किंवा त्यांच्या अल्पप्राप्तीमुळें असो, आणि ही संख्या सध्याप्रमाणें वाढत राहिल्यास १९५१ मध्यें ४३–४४ कोटि आणि १९७१ मध्यें ५८ कोटि माणसांस पुरेल इतक्या अन्नाची तरतूद करावी लागेल ह्या गोष्टीचें स्मरण करून देऊन प्रस्तुत विषयाचें गांभीर्य केवढें आहे हें त्यांनीं निदर्शनास आणलें. ह्या भावी घटनेच्या दृष्टीनें अन्नपुरवठा वाढवण्याच्या प्रयत्नाची प्रगति कशी होत आहे ह्याची कल्पना येण्यासाठीं सर जोगेंद्र ह्यांनीं असें सांगितलें कीं युद्धापूर्वीच्या सरासरीच्या मानानें १९४३–४४ मध्यें ११० लक्ष अधिक एकरांत धान्यांचीं पिकें करण्यांत येऊन त्या योगानें अन्नाच्या उत्पादनांत व पुरवठ्यांत ४० लक्ष टनांची भर पडली. चालू सालचे आकडे अजून उपलब्ध नाहींत, तथापि, कपाशीखालचें क्षेत्रफळ कमी होऊन तांदुळाच्या क्षेत्रफळाची ८ कोटि एकरांची मर्यादा ओलांडली गेली आहे. ह्यावरून परिस्थितींत सुधारणा झाली असली पाहिजे असें त्यांनीं सुचवलें. विहिरी खोदण्यासाठीं व चांगल्या बियाचा पुरवठा शेत-कऱ्यांस व्हावा म्हणून शेतकऱ्यांस द्रव्यसहायहि मध्यवर्ती सर-कारनें दिलें असल्याचें त्यांनीं सांगितलें.

पाश्चात्य देशांच्या मानानें हिंदुस्थानच्या जमिनींत सरासरीनें कमी उत्पन्न येतें असा एक चुकीचा समज रूढ आहे असें म्हणून त्याच्या निराकरणाचा प्रयत्न कृषिमंत्र्यांनीं केला. बागायत जमिनींत दर एकरीं उत्पन्न इतर देशांप्रमाणेंच हिंदुस्थानांत येतें, पण कोरडवाहू जमिनींचें क्षेत्र किती तरी पटीनें विस्तृत असलेमुळें सबंध देशाची सरासरी कमी होते असें स्पष्टीकरण त्यांनीं केलें. हिंदी शेतीचें उत्पन्न असमाधानकारक आहे असें म्हण-णारांस ही कारणमीमांसा माहीत आहे आणि ती पुढें मांड-ण्यांत सर जोगेंद्रसिंग ह्यांनीं नवें कांहींच सांगितलें नाहीं. जमि-नीस पाणी, खतें वगैरेचा पुरवठा होत नाहीं म्हणून हिंदी शेती हलक्या प्रतीची ठरते असेंच लोकमत आजपर्यंत व्यक्त करण्यांत आलेलें आहे. सरकारी सहायाचे आकडे त्यांनीं दिले त्यांवरून सदरहु वैगुण्य कितपत दूर होण्यासारखें आहे ह्याचा त्यांनीं विचार करावा. पाण्यावांचून उंची खतें निरुपयोगी आहेत आणि शेत-मालाच्या किंमती योग्य असल्यावांचून खतें वापरणें नुकसानीचें आहे असा शेरा त्यांनींच स्वतःच्या भाषणांत मारला आहे. अन्न-पुरवठ्याचा प्रश्न किती गुंतागुंतीचा व अवघड आहे आणि तो सोडवण्यास व्यापक व मूलग्राही प्रयत्न सरकारनें करणें कसें अगत्याचें आहे हें त्या भाषणावरूनच उघड होत आहे. निकडीची व्यवस्था तातडीनें केली पाहिजे हें खरें असलें तरी ही तरतूदहि ज्या परिस्थितीवर तोड काढावयाची तिच्या स्वरूपास व महत्त्वास साजेल अशी मोठ्या आकाराची असणें आवश्यक आहे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. सध्याच्या योजना ह्या प्रकारच्या आहेत कीं काय ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे.

---

### कंपन्यांच्या भांडवलविक्रीची प्रसिद्धी

सरकारनें मंजूर केलेल्या शेअर वगैरेची विक्रीची जाहिरात करण्यास खालील परिस्थितींत बंदी करण्यांत आलेली आहेः—( १ ) शेअर वगैरेची विक्री खासगी कंपनीची आहे अथवा ( २ ) शेअर विक्रीस मान्यता देतांना, शेअर्सची विक्री खाजगी रीतीनेंच व्हावी, अशी सरकारनें अट घातलेली आहे.

## औद्योगिक उन्नतीसाठी खडतर तपश्चर्या

### श्री. आत्मारामपंत ओगले ह्यांचें भाषण

( ओगले बंधूंपैकी प्रमुख भागीदार श्री. आत्मारामपंत ओगले ह्यांनीं प्रा. कर्वे ह्यांच्या विनंतीवरून बृहन्महाराष्ट्र कॉलेजाच्या विद्यार्थ्यांस आपल्या औद्योगिक तपश्चर्येची माहिती एका व्याख्यानांत ता. २१ जानेवारी रोजीं सांगितली, ती तेथील तरुण उद्योगोन्मुख विद्यार्थ्यांस मनोवेधी आणि उद्‌बोधक वाटली, ह्यांत नवल नाहीं. कॉलेजांतील पहिल्या वर्षाचे विद्यार्थी श्री. सी. अ. जोशी ह्यांनीं " अर्था " करितां त्याचा खालील सारांश पाठविला आहे. )

कॉलेजचे प्राचार्य कर्वे यांनीं श्री. ओगले यांची आपल्या विद्यार्थ्यांना ओळख करून देतांना सांगितलें कीं, विसाव्या शतकाच्या सुरवातीस लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेनें ज्या तरुणांनीं औद्योगिक क्षेत्रांत उडी घेतली त्यांत श्री. ओगले यांचें स्थान निःसंशय श्रेष्ठ दर्जाचें आहे. जर तपश्चर्या म्हणजे ध्येयासाठी खडतर हालअपेष्टा सोसणें असेल, तर ओगले यांनीं गेल्या चाळीस वर्षे केलेली तपश्चर्या बृहन्महाराष्ट्राच्याच नव्हे तर अखिल हिंदुस्थानच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखी आहे. नंतर श्री. ओगले यांनीं आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषणास सुरवात केली. ते म्हणाले:—

### श्री. ओगले ह्यांचें भाषण

" १९०४ सालीं मी मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यावर इतरांच्या प्रमाणें विश्वविद्यालयीन शिक्षण घेऊन मामलेदारीचा मळलेला मार्ग जर स्वीकारला नसेल तर त्यास कारण माझे वडील बंधू नागूदादा हे होत. त्यांनीं मला नवीन उघडलेल्या तळेगांवच्या कांच शाळेंत उमेदवार म्हणून शिक्षण घेण्यास सांगितलें. पुस्तक वाचून मिळेल तेंच शिक्षण अशी माझीहि कल्पना नसल्यानें त्यांच्या आज्ञेप्रमाणें मी कांच कारखान्यांत गेलों. तेथें चित्रशाळेचे वासुकाका जोशी यांच्या देखरेखीखालीं शिक्षणास सुरवात केली. माझ्या वडील बंधूंच्यासारखी कल्पकता माझ्यांत नसली तरी चिकाटी मात्र होती. हलकीसालकीं शारीरिक कष्टाचीं झाडण्यासारखण्याचीं कामें करण्यांत सुद्धा मी कमीपणा मानला नाहीं. बढवे नांवाच्या गृहस्थाशीं मी बडोद्यास नोकरी धरल्यावर चर्चा करीत असतां आम्ही कांचकारखान्याचा आराखडा तयार केला. वडील, थोरले बंधु, लक्ष्मणराव किर्लोस्कर उर्फ लखूनाना इत्यादींचा सल्ला घेऊन कामास सुरवात केली. तयार केलेला कांचेचा गोळा टिळकांना दाखवल्यावर व एकंदर माहिती सांगितल्यावर त्यांनीं ३००० रु. आम्हाला पैसाफंडांतून उसने दिले. तसेंच औंधकरांनीं ओगलेवाडी स्थापन करण्यासाठी १००० रु. देणगी म्हणून दिले. नंतर डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज 'मीड' साहेबानें नागूदादांस शिष्यवृत्ती देऊन इंग्लंडला औद्योगिक शिक्षणासाठी पाठवलें. पुढें ते २ वर्षे अमेरिकेंतहि होते. त्यावेळेस कंदीलाची योजना त्यांनीं आखली. पंतप्रतिनिधींनीं ९० हजार रुपये यंत्रांकरतां दिले व कंदील तयार होऊं लागले. ' प्रभाकर ' हें त्यास अर्थपूर्ण असें नांव देऊन वडलांचेंहि तें स्मारक बनवलें. मंदी, परकीय मालाची स्पर्धा, स्वकीय व्यापाऱ्यांची आमचा माल पाहून घेण्यासाठी ' स्वदेशी ' म्हणून त्यास हिणविण्याची पद्धत, परदेशी हुंडणावळ, इत्यादींमुळें पुष्कळच ठोकरी आम्हाला बसल्या. अशा गटांगळ्या खाऊनहि त्यांतून ज्यावेळेस माणूस तरून येतो त्यावेळेस त्याचीं अशीं कॉलेजांत व्याख्यानें होतात ! १९३३ मध्यें अमेरिकन डॉलर एकदम घसरला व डझनास एकवीस रुपये पडणारा कंदील एकदम अकरा रुपये डझन मिळूं लागला. त्यामुळें पन्नास हजाराचा पहिल्या सहामाहींत दिसणारा फायदा वर्षअखेरीस तोटा ठरला. लोकांना असें वाटतें कीं कारखानदार म्हणजे युद्धकालीन अडचणींचा फायदा घेऊन गब्बर होणारा प्राणी. पण तेजीच्या काळांत जर आम्हीं दोन पैसे मिळवले नाहींत तर मंदीच्या काळांत सोसलेले तोटे व हाल भरून निघायचे तरी केव्हां व कसे ? मोठमोठे कायदे कौन्सिलांतील लोकहि आम्हांला विचारतात कीं युद्ध संपल्यावरचे तुमचे बेत काय आहेत ? मोठमोठे गोरे साहेबहि आम्हांला यंव करायला पाहिजे त्यंव करायला पाहिजे म्हणून उपदेशाचे डोस पाजतात. पण संरक्षण किती देणार या प्रश्नावर मात्र प्रत्येकानें मूग गिळले आहेत.

### धंद्यांत पतीचें महत्त्व

"शेवटीं, महत्त्वाची अशी एकच गोष्ट मी आपल्याला सांगणार आहे व ती म्हणजे धंद्यांत पत राखण्याची आवश्यकता. एकदा एकाद्या माणसाचे पैसे अमक्या वेळेस देईन म्हणून मी म्हटल्यावर मी ते नेहमी एक दोन दिवस अगोदरच देतों. त्यामुळें माणसाचा विश्वास वाढतो. सहाजीकच तो, ' इतकी घाई कां केली, मला कांहीं त्याची विशेष गर्दी नव्हती ' म्हणून म्हणतो. 'असें होय !' असें म्हणून लगेच तेच पैसे त्याच्याकडून आपणांस जरूर असल्यास परत घ्यायचे. म्हणजे आपलेंहि काम होतें व त्यालाहि पैशाच्या सुरक्षिततेविषयी डोळ्यांनीं बघितल्यावर खात्री होते. आपला जीव गहाण टाका पण वायदा सरायच्या अगोदर पैसे परत करा. एक तारखेला चुकते करायचे पैसे मी आदल्या महिन्याच्या २५ तारखेपासूनच द्यायला सुरवात करतों. माझ्या आयुष्यांत लेक्चरर होण्याची एक इच्छा माझ्या मनांत होती ती आज निराळ्या रीतीनें प्रि. कर्वे यांनीं पुरी केली म्हणायाची !"

---

### हिंदी चित्रपटांचा दर्जा उतरला

" हिंदी चित्रपट व्यवसायाचें १९४२ व १९४३ सालीं उत्पन्न वाढलें तरी चित्रपटांचा दर्जा मात्र सुधारला नाहीं. चित्रपट व्यवसायानें एक नामी संधि गमावली आहे. सुधारणेच्या मार्गांत युद्धजन्य अडचणी थोड्याफार आल्या असल्या तरी दर्जा कमी होण्याचें तरी कांहीं कारण नव्हतें. निदान, १९३६-३७ मधील दर्जा तरी कायम राहावयास हवा होता. सध्या आपल्या सामाजिक चित्रपटांत समाजाचें चित्र अत्यल्प प्रमाणांतहि प्रतिबिंबित होत नाहीं, असें म्हटलें पाहिजे. चित्रपटांत कामें करणाऱ्या नट-नटींनीं एकाच वेळीं अनेक चित्रपटांत काम चालू ठेवून निर्मात्यांवरील ताण कमी केला पाहिजे. स्टुडिओंत आपण दाखल झाल्यानंतर कांहीं ठराविक वेळांत शूटिंग संपलें पाहिजे, अशी त्यांनीं निर्मात्यांवर अट घालावी. निर्मात्यांनींहि प्रमुख नटनटांचा जवळून घ्यावयाच्या चित्रापुरताच उपयोग करून बाकीचें काम तत्सम इतर नट-नटींकडून उरकून घेण्याच्या अमेरिकन पद्धतीचा अवलंब करावा. "—मोशन पिक्चर सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष सर रहिमतुल्ला चिनॉय, ह्यांचें सोसायटीच्या वार्षिक सभेंत भाषण.

# स्फुट विचार

### अन्नपुरवठ्याविषयीं सूचना

दिल्लीमध्यें भरलेल्या अन्न परिषदेंतील चर्चेची पार्श्वभूमि आम्हीं आमच्या अग्र लेखांत हिंदुस्थान सरकारच्या दोन मंत्र्यांच्या भाषणांच्या स्वरूपांत दिग्दर्शित केली आहे. परिषदेनें केलेल्या सूचनांचा उद्देश अन्नपुरठाविषयक सर्वसंमत धोरणास मूर्त स्वरूप देण्यासाठी योजावयाच्या व्यावहारिक उपायांची रूपरेखा आखणें हा होय. लोकांस पुरवावयाचें अन्न अधिक पौष्टिक कसें होईल व त्यांत कोणते फेरबदल करणें जरूर आहे ह्याचा विचार करण्याची आवश्यकता परिषदेनें प्रतिपादिली आहे. धान्यांचें उत्पादन वाढवण्याचे प्रयत्न जारीनें चालू ठेवले पाहिजेत इतकेंच नव्हे तर भाजीपाला, फळें, दूध, अंडीं व मासे ह्यांचा पुरवठा अधिक होईल अशी व्यवस्था झाली पाहिजे असें म्हणून तिचा तपशीलहि परिषदेनें सुचविला आहे. दुधाचें उत्पादन वाढविण्याकरितां विशेष प्रयत्न कसे करावे हें तिनें सांगितलें आहे. शेंगदाण्याच्या उत्पादनास उत्तेजन देण्यांत यावें, एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत व्हावयाच्या ह्या मालाच्या हालचाली निश्चित केल्या जाव्या आणि निर्यात आवश्यक असेल तर ती तेलाची व्हावी, दाण्यांची होऊं नये असा परिषदेचा अभिप्राय आहे. धान्य वगैरेचें उत्पादन वाढवावयाचें तर खतें, पाणी पुरवठा, शेतीचीं हत्यारें इत्यादि साधनें शेतकऱ्यांस उपलब्ध करून दिलीं पाहिजेत ही गोष्टहि परिषदेनें पुढें मांडली. अन्न पुरवठ्याविषयींचा आपला दोन वर्षांचा अंदाजी कार्यक्रम प्रांतांनीं मध्यवर्ती सरकारास पुरवावा आणि तो पुरा करण्यासाठी योजावयाच्या उपायांची कल्पनाहि त्यास यावी असें ठरलें.

---

### देशी उत्पादन, का मालाची आयात?

ब्रिटिश अधिकाऱ्यांशीं वाटाघाट करून इंग्लंडमधून कांहीं जरूरीचा माल हिंदुस्थानांत आणवून त्यासंबंधांत भासत असलेली टंचाई दूर करण्यासाठी हैदरी शिष्टमंडळ नुकतेंच तिकडे गेलें आहे. ह्या बाबतींत हिंदुस्थान सरकारचें काय धोरण आहे ह्याचा सर अकबर ह्यांनीं केलेला खुलासा आम्हीं प्रसिद्ध केलाच आहे. इंग्लंडमधून दर महिन्यास पन्नास हजार टन पोलाद, सिमेंट व विशिष्ट जातीचें कापड ह्या देशांत आणण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें असल्याची बातमी ऐकून हिंदी कारखानदारांमध्यें खळबळ उडाली आहे असें दिसतें. बाहेरून आयात करावयाची तर ती यंत्रसामुग्रीची व उत्पादक साधनांची करा; तयार, पक्क्या मालाची नको असें त्यांचें म्हणणें आहे. हिंदी कारखानदारांशीं अगोदर चर्चा करून त्यांस तयार करतां येण्यासारखा नसेल असाच माल आयात करणें सयुक्तिक होईल, पण ह्या प्रकारचा विचारविनिमय न करतांच सरकारनें सिमेंट, कापड इत्यादि जिन्नस इंग्लंडमधून आणण्याचें ठरवलें असल्यास ह्या धोरणावरील टीका योग्य होईल. पण ज्यास तातडीची मागणी आहे आणि ज्याचा पुरवठा हिंदुस्थानांतील कारखाने वेळेवर करूं शकत नाहींत असा माल आयात न केल्यास केवळ महागाई व नफेबाजी ह्यांस ऊत येईल हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ह्याकरितां कोणता माल इंग्लंडहून आयात व्हावयाचा आहे आणि तो कां आणण्यांत येणार आहे ह्याचा खुलासा सरकारनें करणें अगत्याचें आहे. हिंदी औद्योगीकरणास प्रतिकूल होईल असें धोरण त्यानें अवलंबतां कामा नये. यंत्रसामुग्रीच्या आयातीस प्राधान्य देऊन देशांतील कारखान्यांचें उत्पादन वाढवण्यास आणि ह्या मार्गानें महागाईस आळा घालण्यास सरकारनें मदत करावी अशी मागणी हिंदी धंदेवाले सारखी करीत आले आहेत. ती पुरी कां होऊं शकलेली नाहीं आणि तयार माल आयात करणें अपरिहार्य असल्यास तें कसें आहे व ही नियोजित आयात देशाच्या हिताची कशी आहे ह्याचें स्पष्टीकरण सरकारनें केलें पाहिजे.

---

### भोर स्टेट बँक लि., भोर

ता. १९-८-१९४४ ते ३१-१२-४४ ह्या काळांतील स्टॅच्युटरी रिपोर्टाचा विचार करण्याकरितां वरील बँकेच्या भागीदारांची सभा ता. ११ फेब्रुवारी रोजीं भरणार आहे. त्याच दिवशीं ३१-१२-४४ अखेरचे हिशेब मंजूर करण्यासाठी पहिली वार्षिक सभाहि बोलाविलेली आहे. हे हिशेब पहिल्या साडेचार महिन्यांचेच आहेत. बँकेचे २,५०,००० रुपयांचे सर्व भाग खपले असून वसूल भांडवल १,२५,००० रुपये आहे. बँकेकडे अल्पावधींत दोन लाखांच्यावर ठेवी आल्या आहेत व एकूण ताळेबंद ३,३८,८३१ रुपयांचा आहे. बँकेनें ३ लक्ष रुपये ३% व्हिक्टरी लोनमध्यें गुंतविलेले आहेत. कर्जें फक्त ४०२ रुपयांचींच येणें आहेत; "अहवालाच्या काळांत मंदी असलेमुळें बँकेकडून पैशाची उचल झाली नाहीं, असें वाटतें." प्राथमिक खर्च व ऑर्गेनायझिंगबद्दलचा खर्च हा १,७८६ रुपयांच्या प्रत्यक्ष तोट्यांत मिळवून ३,९२७ रुपये नफा-तोटा खातीं जिंदगीचे बाजूस आहेत. एकूण खपलेल्या भरपाई भांडवलावर पहिलीं पांच वर्षेपर्यंत भोर दरबारनें ३% व्याजाची हमी दिलेली आहे. त्याप्रमाणें, रक्कम मंजूर झाल्यानंतर भागीदारांस डिव्हिडंड वाटलें जाईल. संस्थानाचे दिवाण हे बँकेचे अध्यक्ष असून नावर कंपनीचे मालक श्री. वा. पुं. वर्दे हे तिचे उपाध्यक्ष आहेत. महाराष्ट्र बँकेच्या डेक्कन जिमखाना शाखेचे पूर्वीचे एजंट श्री. श्री. वा. काळे हे मॅनेजर म्हणून काम करीत आहेत. जनतेस बँकेची उपयुक्तता पटून तिचा फायदा भोर संस्थान व त्याच्या लगतचा प्रदेश ह्यांस मोठ्या प्रमाणावर मिळूं लागण्यास सहाजीकच थोडा वेळ लागेल. तज्ञ संचालक व व्यवस्थापक ह्यांच्या अनुभवाचा फायदा बँकेस मिळत आहे ही गोष्ट बँकेच्या प्रगतीस चांगली पोषक आहे.

---

### भाडेकरू गेल्यास तात्काळ सरकारला वर्दी द्या

"मद्रास शहरांतील घरामधील भाड्याची जागा रिकामी होतांच २४ तासांचे आंत घरमालकानें सरकारला कळविलें पाहिजे. सरकारी नियंत्रक अधिकारी सांगेल त्या भाडेकरूस घरमालकानें रहावयास जागा दिली पाहिजे." मद्रास सरकारनें वरील प्रकारचा हुकूम काढला आहे.

### नवी सिमेंट कंपनी

जामनगर संस्थानांत २ कोटि रुपये अधिकृत भांडवलाची व १ कोटि रुपये वसूल भांडवलाची सिमेंट कंपनी निघणार आहे. तिचे ब्रिटिश हिंदुस्थानांत भाग विकण्यास परवानगी मिळाली आहे. संस्थान स्वतः १८ लाखांचे भाग घेणार आहे.

### कलकत्ता क्लब चटणी

वरील नांवाची चटणी न्यूयॉर्क येथें बनविण्यास प्रारंभ झाला आहे. त्यासाठी एका कंपनीची स्थापना करण्यांत आली आहे.

## डॉलर, पौंड आणि हिंदुस्थान

अमेरिका जगांतील इतर देशांकडे फार मोठ्या प्रमाणावर आज कित्येक वर्षे माल निर्गत करीत आहे, परंतु त्या मानानें तिची इतर देशांतील खरेदी अत्यल्प आहे. ह्याचा अर्थ असा आहे, कीं अमेरिकेचें येणें सर्व ठिकाणीं निर्माण झालें आहे; देणें मात्र फारच थोडें निघत आहे. इतर देशांनीं अमेरिकेकडे माल पाठविला, तर त्यांचा त्या प्रमाणांत अमेरिकन चलनावर-डॉलरवर-अधिकार निर्माण होतो, परंतु त्यांची अमेरिकन मालाची खरेदीच सध्या ज्यास्त असल्याकारणानें डॉलर त्यांच्या वाट्यासच येऊं शकत नाहीं. अमेरिकन मालाच्या खरेदीसाठीं द्यावे लागणारे डॉलर उपलब्ध करावयाचे, म्हणजे इतर देशांनीं अमेरिकेकडे मोठ्या प्रमाणावर माल पाठवून तेथें आपलें येणें निर्माण केलें पाहिजे. परंतु, तसें होत नाहीं व अमेरिकन मालाची किंमत देण्यास लागणाऱ्या डॉलर्सचा तुटवडा पडतो. अशा रीतीनें, जगांतील सर्वच देशांना डॉलर ही चीज दुर्मिळ होऊन बसली आहे. युद्धसमाप्तीनंतर, अमेरिकेचा निर्गत व्यापार आणखी वाढेल, अशीं चिन्हें दिसत आहेत. मोटारी, विमानें, यंत्रसामुग्री, कापड, इत्यादींची अमेरिकन निर्गत वाढेल व तिची कपास आणि तंबाखू ह्यांची निर्गत पूर्वीप्रमाणेंच चालू राहील. अमेरिकेची निर्गत वाढेल, त्या प्रमाणांत आयात वाढली असती, तर फारशी कठीण परिस्थिति निर्माण झाली नसती. परंतु, युद्धकाळांत अमेरिकेस कित्येक मालाचे बाबतींत स्वावलंबी होणें भाग पडल्याकारणानें, तिची आयात कमीच होण्याचा रंग दिसतो. अमेरिकेंतील उत्पादन अत्यंत कार्यक्षम व मोठ्या प्रमाणावर म्हणून स्वस्त होत असल्यामुळें, इतर देशांना अमेरिकेंत आपला माल किफायतशीर विकतां येईल, असें वाटत नाहीं.

### अमेरिकेकडे सोन्याचा ओघ

ह्या सर्व गोष्टींचा परिणाम इतर देशांच्या चलनावर झाल्याखेरीज रहाणार नाहीं. कोणत्याच देशास आपलें अमेरिकेचें देणें देतां येणार नाहीं. प्रत्येक देश डॉलर मिळविण्यासाठीं खटपट करील व त्याकरितां त्यास स्वतःच्या चलनावर व हुंडणावळीवर कडक नियंत्रण ठेवावें लागेल. त्यांत यश किती येईल, हें सांगतां येणार नाहीं. १९३९ सालापूर्वीच्या काळांत अमेरिकेनें आपलें येणें सोन्याच्या स्वरूपांत गोळा केलें. जगांतील सर्व चलनी सोन्याचा ओघ अमेरिकेकडे लागून राहिला आणि लवकरच अमेरिकेच्या तिजोरींत सोनें येऊन साठून राहिलें. अमेरिकेचें देणें फेडण्यास इतर देश मालहि पाठवूं शकत नव्हते आणि आतां त्यांचेजवळील सोनेंहि संपलें. निर्माण झालेल्या युद्धपरिस्थितीमुळें इंग्लंड व युरोपांतील देश ह्यांना चलनांवर तात्काळ कडक बंधनें घालावीं लागलीं, म्हणून चलनविषयक परिस्थितीचें गांभीर्य लोकांच्या तेव्हां लक्षांत आलें नाहीं. १९३९ मध्यें लष्करी युद्ध सुरू झालें नसतें, तरी आर्थिक व चलनविषयक युद्धपरिस्थिति निर्माण झालीच असती, असें मि. पीटर ड्रकर ह्यांनीं "रशियानें आर्थिक तटस्थता सोडली" ह्या सॅटर्डे ईव्हिनिंग पोस्टमधील आपल्या लेखांत जें विधान केलें आहे, त्याची पार्श्वभूमि वरील प्रकारची आहे.

### अमेरिकेच्या येण्याची वसुली

अमेरिकेपुढील प्रश्न सुटण्याचे आतां दोन मार्ग आहेत:-( १ ) अमेरिकेनें आपली निर्गत एकदम कमी करावी, किंवा ( २ ) अमेरिकेनें आपलें येणें एकदम वसूल करण्याचा प्रयत्न न करतां तें इतर देशांतील कर्जरोख्यांत गुंतवावें. ह्यांपैकी पहिला मार्ग अमेरिकेस पसंत पडणें शक्य नाहीं. आजच इतर देशांवर आपली कपास लादण्यासाठीं तिच्या निर्गतीस पैशाचें सहाय देण्यास अमेरिकन सरकार तयार झालें आहे. अमेरिकेनें आपली येणें रकम इतर देशांत व्याजी लावावयाची म्हटलें, तरी त्या व्यवहाराचा तपशील कोणी ठरवावयाचा, हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. पैशाचे मालक अमेरिकेंतील धनको लोक व ते वापरणारे परदेशांतील ऋणको लोक, ह्यांपैकी कोणाच्या म्हणण्यास महत्त्व मिळावयाचें व त्या दोघांच्यामध्यें एकवाक्यता निर्माण कशी व्हावयाची ?

### इंग्लंडच्या कर्जाची फेड

अमेरिकन डॉलरचा प्रश्न अमेरिकेचें इतर देशांकडून निघत असलेल्या प्रमाणाबाहेरील प्रचंड येण्यामुळें निर्माण झाला आहे, ह्या उलट ब्रिटिश पौंडाचा प्रश्न इंग्लंडच्या निर्गतीमधील घटीमुळें व इंग्लंडचें परराष्ट्रीय देणें त्याच्या आजच्या आवाक्याबाहेर गेल्यामुळें निर्माण झाला आहे. पूर्वी इंग्लंडला एक आगबोट भरून माल बाहेर पाठवून दोन आगबोटी माल परत मिळवितां येत असे आणि त्या कारणानें ब्रिटिश लोकांचा संसार सुखानें चालत असे. १९ व्या शतकांत ग्रेट ब्रिटननें परराष्ट्रांत निर्माण केलेल्या आपल्या भांडवलाचे व्याजाच्या व डिव्हिडंडच्या पोटीं आणि ब्रिटिश आगबोट कंपन्यांच्या व विमा कंपन्यांच्या उत्पन्नाच्या पोटीं ग्रेट ब्रिटन बराचसा माल मिळवीत असे आणि ह्या कारणानें कमी निर्गतींत पुरेशी आयात मिळविणें त्यास शक्य होई. चालू युद्धाचे काळांत ग्रेट ब्रिटनचें हें भांडवल संपुष्टांत आलें आहे इतकेंच नव्हे, तर ग्रेट ब्रिटनचे पूर्वीचे देणेकरी त्यांचे आतां सावकार बनले आहेत. ह्या भांडवलावरील व्याज व डिव्हिडंड येणें सहाजीकच कमी पडलें आहे. उलट, ग्रेटब्रिटनकडून आपलें येणें वसूल कसें करावयाचें, असा बिकट प्रश्न इतर देशांपुढें येऊन पडला आहे.

### धनको देशांस विवंचना

प्रत्येक देश आपलें ग्रेट ब्रिटनमध्यें पौंडाच्या चलनांत साठलेलें येणें शक्य तितक्या लवकर व कमींत कमी नुकसान सोसून वसूल करण्याचा प्रयत्न करील, हें उघड आहे. त्यामुळें पौंडाचें मुबलक चलन उपलब्ध होईल आणि त्याचा जागतिक चलनपरिस्थितीवर होणारा परिणाम हितावह ठरणार नाहीं. आपल्या निर्गत व्यापाराच्या विनिमयांत जेवढा माल बाहेरून आणतां येईल, तेवढाच आणून उदरनिर्वाह करावयाचा, का आपली निर्गत अनेक पट वाढवून आपली आयात कायम राखावयाची, हा ग्रेट ब्रिटनपुढील महत्त्वाचा प्रश्न आहे. अर्थात, ग्रेट ब्रिटन निर्गत व्यापार वाढविण्याचा प्रयत्न करील व त्यामुळें भयंकर आंतरराष्ट्रीय व्यापारी स्पर्धा निर्माण होईल, हें स्पष्ट आहे. म्हणजे, अमेरिकन डॉलर कसा मिळवावयाचा व साठलेल्या ब्रिटिश पौंडांची वासलात कशी लावावयाची, अशी दोन प्रकारची विवंचना सर्व देशांच्या चलनाधिकाऱ्यांस लागून राहील. सर्व जगास ग्रासणाऱ्या ह्या बिकट प्रश्नाचें उत्तर ब्रिटिश हितसंबंधाचे दृष्टीनें पुढें मांडण्यांत आलें, तें अमेरिकन हितसंबंधांस मारक असल्याकारणानें, त्यांत एकवाक्यता होणें अवघड आहे.

### " पौंडाचे बदली डॉलर द्या "

ब्रेटन वुडस परिषदेंत वरील प्रश्नाचा विचार चालू असतांना मुख्य अडचणी टाळूनच बहुतेक चर्चा चालली होती. हिंदुस्थानाचें येणें ग्रेट ब्रिटनमध्यें वाढत चाललें आहे. त्या पौंडांतील येण्याचें डॉलरमध्यें रूपांतर करतां यावें, अशी व्यवस्था होण्याचें अगत्य हिंदुस्थानतर्फे परिषदेंत प्रतिपादन करणाऱ्या " नव्या दिल्लीच्या तारतम्यशून्य प्रतिनिधीस–तो स्वतः इंग्रज गृहस्थ होता–इतर प्रतिनिधींनीं "हुश हुश" करून तात्काळ खालीं बसविलें." व्यावहारिक महत्त्वाचे प्रश्न बाजूस सारून चलनव्यवस्था स्थिर झाल्यावर करावयाच्या गोष्टींचेंच अवडंबर माजविण्यांत परिषद् कशी गुंगली होती, ह्याचें थोडक्यांत वर्णन वरील प्रकारें मि. डूकर ह्यांनीं केलें आहे. हिंदुस्थानावर त्याचा परिणाम काय होईल, हें पहाणें आतां बोधप्रद होईल. जगांतील राष्ट्रांत स्वतंत्रपणें खुला व्यापार लवकर सुरू होण्याची आतां शक्यता उरली नसल्याकारणानें आंतरराष्ट्रीय व्यापार व चलनविषयक व्यवहार ह्यांवरील सरकारी नियंत्रणें वाढतील व तीं दीर्घ काळ टिकतील. स्वस्त व चांगला माल जेथें मिळेल, तेथें तो घेतां येईलच, असें नाहीं. उदाहरणार्थ, हिंदुस्थानास लागणारी यंत्रसामुग्री,मोटारी, वगैरे माल अमेरिकेंतून घेणें किफायतशीर झालें तरी आपणांस तो माल तेथून आणतां येणार नाहीं. अमेरिकेस त्याच्या किंमतीबद्दल डॉलर कसे द्यावयाचे? ग्रेट ब्रिटनमध्यें आपलें येणें शिल्लक आहे, तेव्हां तें वसूल करण्यासाठीं ब्रिटिश मालच आपणास घ्यावा लागेल; डॉलर उपलब्धच होणार नाहींत. ग्रेट ब्रिटनमधील आपल्या पौंडांतील येण्याचा उपयोग डॉलर मिळण्यांत व त्यामुळें अमेरिकन माल मिळण्यांत होण्याजोगा नाहीं.

### अडचण, परंतु ती बलिष्ठ ऋणकोची

आपल्या परराष्ट्रीय व्यापारी धोरणाचें नेतृत्व स्वतःचे हातीं यशस्वी रीतीनें ठेवून सरकारी नियंत्रणाखालीं परराष्ट्रांशीं व्यापार करणाऱ्या देशांसच ह्यापुढें कांहीं काळ तरी आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांत स्थान मिळूं शकेल. हिंदुस्थान सरकार ब्रिटिश हितसंबंधांस विरोध करूं शकणार नाहीं; त्यामुळें ब्रिटिश पौंडाच्या वर्चस्वाखालील देशांचा एक गट निर्माण होईल, त्यांतच हिंदुस्थानास सामील व्हावें लागेल. परराष्ट्रांशीं परस्पर व्यापारी करार करून व आपल्या साम्राज्याचा ब्रिटिश निर्मितीच्या वाढीस वाव मिळविण्याकडे उपयोग करून ग्रेट ब्रिटन जी व्यापारी योजना आखील, तीमध्यें हिंदुस्थानास ब्रिटिश मालाचा बराच मोठा बोजा उचलावा लागेल, असें दिसतें. ग्रेट ब्रिटननें हिंदुस्थानांत कोणता माल पाठवावा म्हणजे त्यापासून हिंदी उद्योगधंद्यांचें नुकसान होणार नाहीं व नव्यांच्या स्थापनेस अडचण पडेल हें आतां काळजीपूर्वक पहावें लागेल.

---

### घोडा मेला; १ लक्ष रुपयांचा विमा

इंदूरच्या महाराजांचा " व्हॅट अगेन " ह्या नांवाचा घोडा महालक्ष्मी रेस कोर्सवर एकाकी पळत असतां, त्यास पकडून नेण्यांत येत होतें. वाटेंतच तो एकदम मरण पावला. घोड्याचा १ लक्ष रुपयांचा विमा उतरलेला होता.

## आयुर्विम्याचे व्यवसायांत विमेदारांच्या हिताचे दृष्टीनें सुधारणा

### इन्शुअरन्स ॲडव्हायसरी कमिटीच्या सूचना

इन्शुअरन्स ॲडव्हायसरी कमिटीनें आयुर्विमा व्यवसायाचे बाबतींत खालील सुधारणा सुचविल्या आहेत:—

(१) विमा कायदा अंमलांत येण्यापूर्वी रद्द झालेल्या विम्यांसहि विमा कायद्यांतील ११३ वें कलम लागू पडावें; त्यांत विमेदारांचें हित आहे.

(२) एक हजारापर्यंतच्या विम्यास डाक्टरी तपासणीची आवश्यकता असूं नये. हा प्रयोग यशस्वी ठरल्यास, दोन हजारांपर्यंतच्या विम्यासहि तिची आवश्यकता राहूं नये.

(३) विमा कंपन्यांच्या डायरेक्टर बोर्डांवर विमेदारांस प्रतिनिधित्व देण्यांत आलें असलें, तरी त्याचे अपेक्षित सुपरिणाम प्रत्यक्ष दिसून येत नाहींत; कंपन्यांचे अधिकारी लाइफ फंडांतील रकम स्वतःच्या उपक्रमांसाठीं वापरीत असल्याचें आढळलें आहे. सबब, कोणत्याहि एका भागीदारास १० पेक्षा ज्यास्त मतें असूं नयेत व प्रॉक्सींच्या सहायानें मतें नोंदण्याचा अधिकार मर्यादित असावा.

(४) विमा कंपन्यांस नफा होतो, तो विमेदारांनीं भरलेल्या जादा हप्त्यांमुळेंच होतो. तेव्हां, कंपन्यांस येणाऱ्या वाढाव्यापैकीं भागीदारांचा हिस्सा १०% पेक्षा ज्यास्त असूं नये व कालांतरानें तो ७½% व ५% करण्यांत यावा.

(५) विमेदारांना त्यांनीं भरलेल्या हप्त्यांपैकीं १०,००० रुपयांच्या प्रीमियमवर कर माफ असावा.


चंद्रमोहनचा पुकार ऐकून—

'द्रौपदी' घाबरली कां नाहीं?

ती वीररमणी होती—

आजकालची तरुणी नव्हती



नवहंसचा अतिप्रचंड बोलपट

द्रौपदी

कथानक-पटकथा

सुशिलाराणी M.A.L.T.

निर्माता–दिग्दर्शक

बाबूराव पटेल.

प्रमुख भूमिका

सुशिलाराणी M. A. L. T.

३ तिसरा हाऊस-फुल्ल सातवडा

रोज–६॥ व १० वा.

डायमंड प्रकाशन

प्रभात (किबे लक्ष्मी थिएटर) फो. ५५६

रविवार ता. ११ रोजीं सकाळीं १० वाजतां प्रभातमध्यें

आर. के. ओ. रेडिओ पिक्चर —जोन ऑफ पॅरिस.

सोलापूर–भागवत चित्रमंदिरांत ता. १० पासून सुरू होणार!




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

डोक्यांतील उवा १ तासांत
मारण्याचा आश्चर्यकारक शोध
**लायसॉफ**
बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळां उपयोग
दि मागोरा केमिकल कं. लि.
— हिराबाग, पुणें २ —

डोंगरे याच्या
बालामृतानें
अशक्त मुलें
सशक्त होतात.

गेल्या ३० वर्षांत हजारो लोकांनीं अनुभवलेले
**फिव्हर एस.**
सर्व तऱ्हेच्या तापावर अप्रतिम गुणकारी. किं. रु. २
● होमिओ लॅक्स—विन त्रासानें शौच शुद्धि करून, कोठा साफ व निर्दोष करणारें, किं. १ रु. पाकीट ८॥
● बाल मित्र—लहान मुलांना उद्भवणाऱ्या सर्व विकारांवर खात्रीचा उपाय. किं. रु. २
पॅकिंग व पोस्टेज खर्च निराळा पडेल.
तुमच्या नजीकच्या दुकानांत वरील औषधें मागा. तें अधिक फायद्याचें आहे.
एजन्सी नसलेल्या गांवीं स्टॉकिस्ट नेमणें आहेत.
सुधा एजन्सी,
३८ खांडके बिल्डिंग, दादर, मुंबई नं. १४.

**सांडू**
**टोमॅटो कम्पाऊन्ड**
(ए. बी. डी. व्हिटॅमिन्युक्त)
स्फूर्तिदायक, पाचक व पौष्टिक. भूक न लागणें, पंडुरोग, रिकेट्स व अशक्तता यांवर अत्यंत उपयोगी.
ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ, मोती चौक, पुणें २.
कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन
सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स**
गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार
**पूना गेस्ट हाऊस** टेलिफोन नं. ७७९


हे पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.